जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३०५ दिनांक - ०१/०८/२०२४**

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## मोटार सायकलचा धक्का लागल्याच्या कारणावरून तरुणाच्या गळ्यावर धारदार हत्याराने वार करणा-यास केले जेरबंद

दि.२१/०७/२०२४ रोजी नवाजीश चौक येथील हयात हॉटेल शेजारी फिर्यादी हे त्यांचे नातेवाईकांना रिक्षामध्ये बसवित असताना दुचाकी गाडीवर आलेल्या तीन अनोळखी इसमांचा धक्का लागल्याने फिर्यादी यांनी त्यास गाडी नीट चालविता येत नाही का असे विचारले असता त्यांच्यामध्ये वाद झाला. दुचाकी गाडीवरील तीन इसमांपैकी सोहल जावेद शेख उर्फ सोहेल शुटर वय २१ वर्षे रा.शिवनेरी नगर कोंढवा पुणे याने फिर्यादी यांचा पाठलाग करून त्याच्याकडील धारदार हत्याराने जीवे मारण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांचे गळ्यावर वार करून त्यांना गंभिर जखमी केले.म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादी वरून कोंढवा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.८८०/२०२४ भारतीय न्याय संहिता अधिनियम सन २०२३ चे कलम १०९,११५(२),३५२,३(५) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा घडल्यानंतर मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली कोंढवा तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक बालाजी डिगोळे व तपास पथकातील अंमलदार यांनी तपास सुरू केला. सदर आरोपींचा शोध घेत असताना तपास पथकातील पोलीस अंमलदार संतोष बनसुडे व ज्ञानेश्वर भोसले यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सदर गुन्ह्यातील आरोपी **सोहल जावेद शेख उर्फ सोहेल शुटर वय २१ वर्षे रा.शिवनेरी नगर कोंढवा पुणे** हा पारसी मैदान येथे थांबलेला आहे. सदर आरोपी यास पारसी मैदान येथून ताब्यात घेवून त्यास दाखल गुन्ह्यामध्ये अटक केली आहे. सदर आरोपीच्या पोलीस कस्टडी दरम्यान सदरचा गुन्हा त्याने त्याचा साथीदार नामे **फैज अकबर खान वय २४ रा. टिटवाळा मुंबई** याच्यासह केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपी यास सुद्धा तपास पथकाने टिटवाळा, मुंबई येथून ताब्यात घेवून त्यास दाखल गुन्ह्यामध्ये अटक केली आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.पोलीस उप-आयुक्त परि-५,श्री आर.राजा,मा.सहा.पोलीस आयुक्त धन्यकुमार गोडसे, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोंढवा पोलीस स्टेशन श्री.संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री मानसिंग पाटील, व पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्रीमती रूणाल मुल्ला, यांच्या मार्गदर्शनाखाली कोंढवा पोलीस स्टेशन येथील तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक बालाजी डिगोळे पोलीस अंमलदार सतिश चव्हाण, विशाल मेमाणे, निलेश देसाई, गोरखनाथ चिनके लक्ष्मण होळकर,संतोष बनसुडे,शाहिद शेख, ज्ञानेश्वर भोसले,सुजित मदन,सुरज शुक्ला यांच्या पथकाने केली आहे.